## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४७५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २९/०६/२०१७

**१) मोटार पंपाची चोरी .:–**

दिनांक २८/०६/२०१७ चे १३.५४ वा. दर. यातील फिर्यादी चंद्रभान अनतंराम घोनाडे वय ३० वर्ष रा. टोला/देवनाडा यांच्या शेतावर पाणी देण्याकरीता नाल्यावर लावण्यात आलेली अनुदानावरील प्रोटॉन कंपनीची मोटार पंप कि. ७,०००/रु ची कोणीतरी अज्ञात चोराने कुनीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा लिल्हारे पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**२) संगनमत करून घराचे बांधकामाचे कारणावरून भांडण करून काठीने मारून जिण्यांची तोडफोड केल्याने गुन्हा नोंद .:–**

दिनांक २७/०६/२०१७ चे १८.०० वा.फिर्यादी यादोराव साधुजी बान्ते वय ६० वर्ष रा. नेहरूवार्ड बेला यांच्या घराचे बाधंकाम करून जिण्याची कानसपट्टी आरोपी क्र. ०१ व ०२ यांनी आमचे जागेत आहे असे म्हणुन भांडण व संगणमत करून फिर्यादी व त्याचा मुलगा राजेश व पत्नी ताराबाई हिला आरोपी क्र.२ ने काठीने तिचे मुलाचे डोक्यावर आरोपी क्र. ०३ ने फिर्यादीचे नाकावर व खादयाचर आरोपी क्र. ०१ मोरून जखमी केले व जिण्याची तोडफोड करून नुकसान केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,४२७,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेपुंजे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन मकानाचे बांधकामाच्या जागेच्या वादावरुन भांडण करुन काठीने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद .:–**

दिनांक २८/०६/२०१७ चे १८.०० वा. दर. यातील फिर्यादी भगवान सहादेव बान्ते वय ३२ वर्ष, तिन्ही रा. नेहरु वार्ड बेला व त्याचा चुलत भाऊ पुरुषोत्तम बान्ते यांचे नवीन घराकडे बांधकाम पाहण्यास गेला असता यातील आरोपी क्र. ०१ याने आपले मकानाचे जिण्याचे लॅन्डींग वाढविल्याने व जागेच्या वादावरुन तोंडातोडी भांडण सुरु होते. यातील फिर्यादी हा त्याचे भावाचे घराचे गेटमध्ये उभा असता यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी यास आरोपी क्र. ०२ ने काठीने डोक्यावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेपुंजे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) संगनमत करुन येण्या जाण्याच्या कारणावरुन भांडण व शिवीगाळ करुन लाकडी काठीने मारुन जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २८/०६/२०१७ चे १९.३० वा. दर. यातील आरोपीतांनी संगनमत करुन घरासमोरील रोडची जागा आमची आहे. तु या रोडने येणे – जाणे करुन नको याकारणावरुन फिर्यादीस बोलुन शिवीगाळ, भांडण करुन लाकडी काठीने फिर्यादीचे डावे हातावर व तिचे मुलीस मारहाण करुन जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी सौ. कमला धनपाल बावनकर वय ४० वर्ष, रा. केसलवाडा यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,३२३,५०४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चाबुकस्वार पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) संगनमत करुन क्षुल्लक कारणावरुन शिवीगाळ व भांडण करुन बांबुचे काठीने मारुन जखमी केल्यान गुन्हा नोंद . :—**

दिनांक २१/०६/२०१७ चे १४.१५ वा . दर. यातील आरोपीने फिर्यादीस व फिर्यादीचे पतीस कोंबडीचे पिल्ले विकले या वादावरुन आरोपीतांनी संगनमत करुन शिवीगाळ व भांडण करुन बांबुचे काठीने फिर्यादीचे पती शंकर लिमजे वय ३८ वर्ष, हयाला आरोपी क्र. ०१ ने मानेवर मारुन जखमी केल्याने फिर्यादी सौ. शांता शंकर लिमजेव य २८ वर्ष, रा. धर्मापुरी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३२४,५०४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाणे पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**६) रेतीची बिनापास परवाना चोरी करतांनी मिळुन आला रेती तहसिल कार्यालय येथे खाली करुन पळुन गेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २७/०६/२०१७ चे २३.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी एम.यु वाकलेकर वय ४५ वर्ष, रा. नायब तहसिलदार तहसिल कार्यालय भंडारा हे एनएच ०६ रोड हॉयवेनी पेट्रोलींग करीत असता जिंदल पेट्रोल पंप येथे अंदाजे ०५ ब्रास रेती सह उभा असतांनी ट्रक मिळुन आल्याने आरोपी ट्रक चालकासह रेती वाहुन नेण्याचा परवाना विचारले असता परवाना नसल्याचे सांगीतल्यावरुन फिर्यादीचे आरोपी ट्रक चालकासह रेती ट्रक तहसिल कार्यालय येथे जमा करण्या साठी आदेशित केले असता रेती खाली करुन पळुन गेल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोस्टे भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**७) शेतशिवारातुन कॉपर वायरची चोरुन नेल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २८/०६/२०१७ चे ०१.४० वा. दर. यातील आयुध निर्माणी फॅक्ट्री सायडींग स्थित खंबा क्र. १०७४/ ऑफ १२/३४ पिंगलाई शेतशिवारातुन खांबाला लावलेली ५० मिटर कॉपर वायर किंमती १०,०००/—रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी पुरुषोत्तम लालसमय लालपाल वय ३८ वर्ष रा. तुमसर कनिष्ठ अभियांत्रीक रेल्वे विभाग तुमसर रोड यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**८) अवैध देशी दारु/ जुगार अडयावर धाडी . :—**

दिनांक २८/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, मोहाडी, करडी, आंधळगाव, साकोली, पवनी व अडयाळ येथे अवैध देशी दारु/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण १२ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ८० लिटर हातभट्टी दारु किंमती ६६५०/—रु. ४ लिटर ५०० मिली लीटर देशी दारु किंमती १२९०/—रु. तसेच जुगारातुन ५३०/रू. माल, असा एकुण किंमती ८,४७०/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

सपोनी. अे.टी. सुनगार
नियंत्रण कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र ९८२३१२३३३६

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.